# D

SL. No. : N

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 64 ]
Total No. of Questions : 64 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

**CCE PR**
**UN-REVISED**

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

**Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 22. 06. 2018 ] [ Date : 22. 06. 2018

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 09-30 A.M. to 12-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 64 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

Tear here

## विभाग-A

### ( गद्य पद्यांशावर आधारीत )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा. 16 × 1 = 16

1. वसईवर कोणाचा अंमल होता ?
2. चि. वि. जोशींच्या मानसपुत्रांची नांवे लिहा.
3. लेखकाने स्वयंपाकासाठी कोणाची निवड केली ?
4. पिंगपाँग हा खळ प्रथमतः कोठे खेळला जाई ?
5. 'आई समजून घेताना' पाठाचे लेखक कोण ?
6. खांद्यावरची घागर कशाने भरल्यासारखी वाटते ?
7. किराणा घराण्याचे संस्थापक कोण ?
8. 'स्वरगंगा' पाठाचा साहित्यप्रकार कोणता ?
9. कवी मुकुंदराज यांचे पूर्ण नांव लिहा.
10. रूक्मिणीला किती भाऊ होते ?
11. 'माझ्या माहेराला' कवितेचे मूल्य कोणते ?
12. बोक्याने आपली एकादशी कशी मोडली ?
13. मानवाच्या मुक्तीसाठी काय केले पाहिजे ?
14. संत ज्ञानेश्वरांच्या ओव्यांचा कोणत्या शब्दात गौरव केला आहे ?
15. आईच्या डोळयात पाणी का आले ?
16. धूमकेतू कशाप्रकारे आर्जवे करतो ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा. 13 × 2 = 26

17. केसोबास यांचा परिचय लिहा.

18. चिमाजी अप्पांनी कोणता निश्चय केला ?

19. 'आम्ही अगदी अंधारात होतो.' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

20. कविला कावळ्याने कोणता शकून सांगावा असे वाटते ? कवी त्याला काय देऊ इच्छितो ?

21. पाहुणे कसे निगरगट्ट आहेत ते सांगा.

22. 'कुठून आणतात तेल हळदीच्या वाटीचे बळ' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

23. जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गोष्टी कारणीभूत ठरल्या ?

24. जपानी स्त्रिया कोणकोणती कामे करतात ?

25. लेखकाच्या जेवणात कोणकोणते पदार्थ होते ?

26. आईने लेखकास कोणते आश्वासन दिले ?

27. चांगल्या शिष्याची लक्षणे सांगा.

28. परार्थीचा आप्तविस्तार कसा असतो ?

29. सासर आणि माहेर यातील फरक कसा सांगितला आहे ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा. 10 × 3 = 30

30. 'विद्या महासागरासारखी आहे' म्हणजे काय ?

31. लेखक काय वापरण्याच्या विरोधात आहे ? दुकानदाराला आश्चर्य का वाटले ?

32. लेखकाच्या सायकल प्रवासाचे वर्णन करा.

33. शेवटी गणातात्यांनी कोणता निर्णय घेतला ? का ?

34. 'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणत आहे ?

35. कृष्ण, कर्ण, सौभद्र, मार्कंडेय यांचे दाखले स्पष्ट करा.

36. पृथ्वी सूर्याची याचना कशी करत आहे ? तिची सध्याची अवस्था कशी आहे ?

37. स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

38. बेळगांवी काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.

39. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रूक्मिणी काय करणार आहे ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा. 5 × 4 = 20

40. 'हिरवे सांगाती' पाठातील सर्व वृक्षांची वैशिष्ट्ये लिहा.

41. फुले शाळेत कशाप्रकारे मशगूल असायचे ? त्यांनी सावित्रीबाईना कशाप्रकारे शिकविले ?

42. 'या भारतात बंधुभाव' कवितेचा सारांश लिहा.

43. 'काया मातीत' कवितेतील निसर्ग वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

44. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

त्या काळी धरणीच्या ................................................

...........................................................................

...........................................................................

................................................... आज असे सत्कार.

## विभाग-B

### ( व्याकरणावर आधारीत )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा. 10 × 1 = 10

45. 'निरक्षर' ही संधी अशी सोडवतात

(अ) नि + अक्षर (ब) निर + क्षर

(क) निः + अक्षर (ड) नि + क्षर

46. 'गंगूबाईनी देशप्रेमाचे धडे गिरवले.' या वाक्यात 'गंगूबाइ' याला या विभक्तीचा प्रत्यय लागतो.

(अ) प्रथमा (ब) तृतीया

(क) पंचमी (ड) द्वितीया

47. 'मांजर दूध पिते.' हे या प्रयोगाचे उदाहरण आहे.

(अ) कर्तरी (ब) भावे

(क) कर्मणी (ड) यापैकी नाही

48. 'कुत्र्याला काठीने मारले' या वाक्यातील काळ

(अ) भूतकाळ (ब) वर्तमान काळ

(क) रिती भूतकाळ (ड) भविष्य काळ

49. 'डोळ्यात केर कानात .............' म्हण पूर्ण करा.

(अ) कचरा (ब) काठी

(क) फुंकर (ड) कर्णफुले

50. 'चे चकाकते ते सोने नव्हे' या वाक्याचा प्रकार

(अ) संयुक्त वाक्य (ब) मिश्र वाक्य

(क) आज्ञार्थी वाक्य (ड) नकारार्थी वाक्य

51. 'ज्ञान प्रकाश' हे या समासाचे उदाहरण

(अ) विभक्ती तत्पुरुष समास (ब) द्विगू समास

(क) अव्ययीभाव समास (ड) बहुर्विही समास

52. 'स्वतःला आलेला अनुभव' शब्दसमहाला एक शब्द

(अ) परानुभव (ब) स्वानुभव

(क) अनुभव (ड) व्यक्तीनुभव

53. 'बाळ <u>दुडूदुड</u> पळते' अधोरेखित शब्दाची जात कोणती ?

(अ) क्रिया पद (ब) विशेषण

(क) क्रिया विशेषण (ड) सर्वनाम

54. संस्कृत मधून जसेच्या तसे आलेले शब्द

(अ) मराठी (ब) संस्कृत

(क) तत्सम (ड) तद्‌भव

VI. खालील दोन शब्दातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा. $4 \times 1 = 4$

55. कुसुम : फूल : : पदम : ..............

56. देव : दानव : : दिवस : ..............

57. उद्‌गारवाचक : ! : : संयोग चिन्ह : ..............

58. माकड : माकडीण : : मोर : ..............

VII. सूचनेप्रमाणे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. $3 \times 2 = 6$

59. 'ही गाडी जावयाची आहे.' अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

60. 'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे.' गण पाडून वृत्त ओळखा.

61. खालील वाक्‌प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

i) पांग फेडणे

ii) कैलासवासी होणे

## विभाग-C

### ( लेखन व रचनेवर आधारीत )

VIII. 62. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर कल्पनेचा विस्तार करा. 1 × 3 = 3

(i) जया अंगी मोठेपण तया यातना कठीण

(ii) रक्तदान हे श्रेष्ठदान.

IX. 63. तुमच्या परिसरातील केरकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेला विनंती अर्ज लिहा. 1 × 5 = 5

**किंवा**

तुमच्या भावाच्या हृदय शस्त्रचिकित्सेसाठी मदत करणाऱ्या तुमच्या मित्राचे आभार मानणारे पत्र लिहा.

X. 64. खालीलपैकी एका विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा. 1 × 5 = 5

(i) स्त्री भ्रूणहत्या.

(ii) मी भारतमाता बोलते.

(iii) पर्यावरणाचे रक्षण काळाची गरज.